**<u>ठळक बातम्या</u>**

- बिहारमधल्या मतदार याद्या विशेष पुनरीक्षणाच्या मुद्द्यावरून संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब, दोन विधेयकं मंजूर

- उपराष्ट्रपतीपदासाठी इंडिया आघाडीची उमेदवारी निवृत्त न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांना जाहीर

- युद्ध संपवण्यासाठी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी थेट चर्चा करायची युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांची तयारी

- महाराष्ट्रात जोरदार पावसामुळे मुंबईसह अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत /रायगड आणि पुणे घाट परिसराला रेड अलर्ट

- ज्येष्ठ अभिनेते अच्युत पोतदार यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

**आणि**

- आशिया चषक टी-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा, कर्णधार सूर्यकुमार यादव, तर शुभमन गिल उपकर्णधार

**<><><><><>**

बिहारमधल्या मतदार याद्यांच्या विशेष पुनरीक्षण प्रक्रियेच्या मुद्द्यावरून संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज आज दिवसभर वारंवार विस्कळीत झालं.

**गदारोळामुळे लोकसभेचं** कामकाज आज तीन वेळा काही काळासाठी, आणि शेवटी दिवसभरासाठी तहकूब करावं लागलं. गदारोळातच IIM, अर्थात भारतीय व्यवस्थापन संस्था सुधारणा विधेयक, २०२५ मंजूर झालं.

**राज्यसभेतही** आज दिवसभर गोंधळाचं वातावरण राहिलं. खाण आणि खनिजे विकास आणि नियमन सुधारणा विधेयक, २०२५ राज्यसभेनं मंजूर केलं, आणि त्यानंतर सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**<><><><>**

उपराष्ट्रपतीपदाच्या आगामी निवडणुकीसाठी इंडीया आघाडीनं सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांना उमेदवारी दिली आहे. इंडीया आघाडीच्या सर्व घटकपक्षांनी एकमतानं रेड्डी यांच्या नावाला संमती दिल्याची माहिती काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आज नवी दिल्लीत इंडीया आघाडीच्या घटकपक्षांच्या संयुक्त वार्ताहर परिषदेत दिली.

ही निवडणूक विचारधारेची असून राज्यघटना जेव्हा धोक्यात येते, तेव्हा सगळे विरोधी पक्ष एकजुटीनं त्याविरोधात उभे राहतात, असं खर्गे म्हणाले.

**<><><><>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या संसदीय पक्षाच्या आज नवी दिल्ली इथं झालेल्या बैठकीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी एनडीएचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांचा परिचय करून दिला, आणि त्यांची एकमतानं निवड करण्याचं आवाहन केलं.

**<><><><>**

युद्ध संपवण्यासाठी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी थेट चर्चा करायला आपण तयार असल्याचं युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी म्हटलं आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि युरोपियन नेत्यांशी व्हाईट हाऊसमधे झालेल्या चर्चेनंतर ते बातमीदारांशी बोलत होते.

कोणतीही पूर्व अट न घालता पुतीन यांच्याबरोबर कोणत्याही स्वरुपाच्या बैठकीसाठी आपण तयार असल्याचं त्यांनी सांगितलं. पुतीन आणि झेलेन्स्की यांच्यात थेट चर्चेची योजना ट्रम्प यांनी बैठकीनंतर जाहीर केली. युद्ध संपवण्यासाठी

ट्रम्प यांनी रशियावर दबाव आणावा, असं मत जर्मनी आणि फ्रान्सनं या बैठकीत व्यक्त केलं.

<><><><>

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आज रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्याशी फोनवर चर्चा केली. पुतिन यांनी ट्रम्प यांच्या पुढाकाराचं स्वागत केलं आहे. दोन्ही नेत्यांनी भविष्यातल्या वाटाघाटींमध्ये उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना सहभागी करून घेण्यावर चर्चा केली तसंच, इतर आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर संपर्कात राहण्यावर सहमती दर्शवली.

<><><><>

राजस्थानात कोटा - बुंदी इथं ग्रीन फील्ड विमानतळ उभारायला केंद्रीय मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. १ हजार प्रवासी क्षमतेचा हा विमानतळ २० हजार चौरस मीटर क्षेत्रावर उभा राहत असून त्याकरता १ हजार ५०७ रुपये खर्चाला मंजुरी मिळाली आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. ओदिशामधे राजधानी क्षेत्रात ६ पदरी रिंगरोड बांधण्याच्या प्रकल्पाला देखील आजच्या बेठकीत मंजुरी मिळाली.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या २२ तारखेला बिहारमध्ये गया इथं औंटा-सिमारिया प्रकल्पाचं उद्घाटन करणार आहेत. या प्रकल्पात पाटणा जिल्ह्यातल्या मोकामा आणि बेगुसराय यांना जोडणाऱ्या गंगेवरच्या पुलाचा समावेश आहे.

<><><><>

सौरऊर्जा आणि विदा क्षेत्रातल्या १० सामंजस्य करारांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत आज मंत्रालयात स्वाक्षऱ्या झाल्या. या सामंजस्य करारांमुळे राज्यात ४२ हजार ८९२ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून, २५ हजार ८९२ रोजगार उपल्बध होतील, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रात पावसाचा जोर आजही कायम असून, गेल्या तीन-चार दिवसांत मोठ्या प्रमाणात झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यात ८ जणांचा बळी गेला, तर १२ ते १४ लाख एकरावरच्या पिकांना फटका बसला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज वार्ताहरांशी बोलताना ही माहिती दिली.....

***होल्ड... बाईट- देवेंद्र फडनवीस***

**मुंबई शहर आणि उपनगरांत** जोरदार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं. मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या रुळांवर पाणी साचल्यानं वाहतुकीवर परिणाम झाला. अनेक गाड्या रद्द करण्यात आल्या. शहरातल्या अनेक रस्त्यांवर पाणी साचल्यानं वाहतूक ठप्प झाली. बेस्ट बसगाड्यांचे मार्ग वळवण्यात आले.

**रायगड आणि पुणे घाट** परिसराला हवामान विभागानं रेड अलर्ट दिला, तर रत्नागिरी, कोल्हापूर घाट, सातारा घाट, मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, नाशिक घाट आणि नंदुरबार या भागांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ अभिनेते अच्युत पोतदार यांच्या पार्थिवावर आज ठाण्यातल्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. पोतदार यांचं काल रात्री ठाण्यातल्या ज्युपिटर रुग्णालयात निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते.

लष्करातून कॅप्टन म्हणून १९६७ मधे निवृत्त झाल्यानंतर इंडियन ऑईलमधे नोकरीत असताना त्यांनी अभिनयाचा छंद जोपासला. मराठी रंगभूमी, दूरचित्रवाहिनी मालिका, आणि चित्रपटांमधे विविध चरित्र भूमिकांमधे त्यांनी ठसा उमटवला. १९८० मधे 'आक्रोश' आणि 'अल्बर्ट पिंटो को गुस्सा क्यों आता है' या गाजलेल्या चित्रपटांमधे त्यांनी त्यांच्या अभिनयाची चमक दाखवली आणि नंतर 'अर्धसत्य', 'नासूर', 'तेजाब', 'प्रहार', 'वंश', 'चमत्कार', 'रंगीला', 'अग्निसाक्षी', 'तीसरी आंख', 'परिणीता' अशा तब्बल सव्वाशे चित्रपटांमधे त्यांनी काम केलं. 'थ्री

ईडियट्स’ या चित्रपटातला "अरे कहना क्या चाहते हो?" हा त्यांचा संवाद तुफान लोकप्रिय ठरला. त्याखेरीज ९५ दूरचित्रवाहिनी मालिका, २६ नाटकं त्यांच्या नावावर जमा आहेत.

<><><><><>

आशिया चषक टी-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा झाली आहे. या संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव असेल. शुभमन गिल याच्याकडे उपकर्णधार पदाची धुरा असेल. या संघात अभिषेक शर्मा, टिळक वर्मा, हार्दिक पंड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल, जितेश शर्मा, जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंग, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव, संजू सॅमसन, हर्षित राणा, रिंकू सिंग यांचा समावेश आहे.

आशिया चषक स्पर्धा येत्या ९ ते २८ सप्टेंबर दरम्यान अबुधाबी आणि दुबई इथं होईल. भारताचा पहिला सामना १० सप्टेंबरला संयुक्त अरब अमिरातीबरोबर होईल. तर, १४ सप्टेंबरला पाकिस्तानशी सामना होईल.

<><><><><>

आगामी एकदिवसीय महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेसाठी भारताचा १५ सदस्यांचा संघ आज जाहीर झाला. हरमनप्रीत कौर या संघाचं नेतृत्व करणार आहे. शेफाली वर्माला या संघात स्थान मिळालेलं नाही. तर रेणूका ठाकूरचं पुनरागमन झालं आहे. पूजा वस्त्राकारच्या जागी अष्टपैलू अमनज्योत कौरला संधी मिळाली आहे.

येत्या ३० सप्टेंबरला बंगळुरु इथं भारत आणि श्रीलंका यांच्यातल्या सामन्यानं महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धा सुरु होणार आहे.

<><><><><>

राज्यातल्या गणेशभक्तांच्या सोयीसाठी यंदा रेल्वेनं गाड्यांच्या ३६७ अतिरिक्त फेऱ्या सोडण्याचं नियोजन केलं आहे, याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस

यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि  रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानले आहेत.

<><><><><>

मुंबई महानगर प्रदेश विकास योजनेच्या टप्पा ३ आणि ३A अंतर्गत नवीन रेल्वे गाड्यांची खरेदी करण्याला राज्यशासनानं  मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत हा निर्णय झाला. पहिल्या टप्प्यात तब्बल २६८ पूर्ण वातानुकूलित गाड्या खरेदी होणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

मुंबईत वडाळा डेपो ते गेटवे ऑफ इंडिया या १६ किलोमीटर लांबीच्या पूर्ण भूमिगत मार्गिकेच्या बांधकामाला, बेस्टबरोबर संयुक्त विकास प्रकल्पाअंतर्गत व्यावसायिक संकुल उभारायला, तसंच ठाणे ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळादरम्यान २५ किलोमीटर लांबीचा उन्नत मार्ग उभारायलाही मंजुरी देण्यात आली.

//<><><><><>//